# आकाशाला प्रार्थनापूरित साद

## श्रीगुरुमाईंसमवेत सिद्धयोग सत्संग

### शुक्रवार, ३ जानेवरी, २०२०

शुक्रवार, ३ जानेवारी, २०२० रोजी श्री मुक्तानंद आश्रमात श्रीगुरुमाईंच्या समवेत एक सिद्धयोग सत्संग आयोजित केला गेला. हा सत्संग ईस्टर्न स्टँडर्ड वेळेनुसार [यू.एस.ए.] सकाळी ११.३० पासून ते दुपारी १.०० वाजेपर्यंत संपन्न झाला आणि या सत्संगाचा एकमात्र उद्देश होता, ऑस्ट्रेलियासाठी वर्षारूपी आशीर्वादांचे आवाहन करणे.

मागील अनेक महिन्यांपासून ऑस्ट्रेलियाच्या जंगलांमध्ये लागलेली आग जी अगदी किरकोळ प्रमाणातील आग आहे असे वाटत होते, त्या आगीने आता एका विशालकाय वणव्याचे रूप धारण केले आहे, त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना, झाडाझुडपांना आणि वन्य प्राण्यांना त्या आगीने संकटात टाकले आहे. प्रदीर्घ काळ पडलेल्या दुष्काळामुळे जंगलातील या आगीच्या प्रमाणात फार मोठी वाढ झाली आहे.

अशा एखाद्या आपत्तीचा जेव्हा सामना करावा लागतो, विशेषतः जी एवढ्या मोठ्या प्रमाणात असेल, तेव्हा लोकांच्या मनात असा विचार येणे स्वाभाविक असते की, ते काय करू शकतात, ते कशा प्रकारे मदत करू शकतील; या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्यात कोणती क्षमता आहे. सिद्धयोग मार्गावर गुरुमाई शिकवतात की, एक गोष्ट जी आपण सर्वजण करू शकतो, ती आहे प्रार्थना — या जगात आपण कुठेही असोत किंवा आपल्याकडे कोणतीही साधनसंपत्ती असो वा नसो, तरीही. आपण प्रार्थना करू शकतो आणि आपण आशीर्वाद पाठवू शकतो. सत्संगामध्ये तसेच या जगाच्या व यामधील रहिवाशांच्या हितासाठी सिद्धयोग अभ्यास करण्यामध्ये अपार शक्ती आहे. अनेक लोक व्यक्तिगत रूपाने आपल्या प्रार्थना तर पाठवत आहेतच; पण तरीदेखील सामूहिक संकल्पशक्तीइतकी सामर्थ्यशाली दुसरी कोणतीही गोष्ट नाही. म्हणून गुरुमाईंनी सांगितले की, आपण सर्वांनी एकजुटीने प्रार्थना करावी.

श्रीगुरुमाईंच्या सांगण्यावरून ३ जानेवारीला झालेला सत्संग मेघ मल्हार रागामध्ये स्वरबद्ध केलेल्या संगीताने दुमदुमला. या रागाच्या गायनाने मेघ स्वाभाविकपणे एकत्रित होतात आणि धरतीवर शुद्ध, पवित्र जलाचा वर्षाव करतात.

श्रीगुरुमाईंनी 'झरि लागै महलिया गगन घहराय' हे भजन गायले आणि त्या जेव्हा हे भजन गात होत्या, तेव्हा सहभागी झालेले लोक त्यांना लक्षपूर्वक ऐकत होते आणि मग तेदेखील गुरुमाईंसमवेत गाऊ लागले. संतकवी धर्मदास यांनी लिहिलेल्या या भजनात या प्रतिमेचे चित्रण केले गेले आहे की, जलाने भरलेले ढग अंतराकाशात अमृतवर्षा करत आहेत. श्रीगुरुमाईंनी या भजनाची संगीतरचना ऑस्ट्रेलियातील त्यांच्या टीचिंग्ज् व्हिझिट्च्या दरम्यान, सन १९९७मध्ये सिडनी शहरात केली होती. त्यांनी ही संगीतरचना मेघ मल्हार रागात केली.

भजनानंतर गुरुमाईंनी सर्वांना निर्देशित केले की, सर्व सहभागींनी अशी कल्पना करावी की, सौम्यतेने बरसणारी वर्षा चमचमते आहे; सर्वांनी अशी कल्पना करावी की, ही वर्षा तप्त धरणीला शीतलता प्रदान करते आहे; अशी कल्पना करावी की, प्रत्येक ठिणगीचे रूपांतर जलामध्ये होते आहे आणि ती ओलाव्याने चकाकते आहे. मग गुरुमाईंनी सर्वांना 'ॐ'चे गायन करण्यासाठी निर्देशित केले आणि हा आदिनाद जेव्हा सर्वत्र स्पंदित होऊ लागला, तेव्हा सहभागी झालेल्या लोकांनी वर्षेचे आवाहन करणारी वाद्ययंत्रे वाजवत सत्संग हॉलमध्ये चालायला सुरुवात केली.

त्या क्षणी हे सुस्पष्ट होते की, लोकांचे संकल्प, त्यांनी केलेली मानसचित्रणे तसेच स्वयं ब्रह्मांडातून उदित होणारी 'ॐ'कार नादाची शक्ती, हे सर्व खरोखरच ऑस्ट्रेलियाच्या व न्यूझीलंडच्या दिशेने प्रयाण करत आहेत. हा अनुभव इतका सुंदर होता की, त्याचे वर्णन करता येणार नाही. असे वाटत होते, जणू सत्संगातील सहभागी लोक जगातील त्या सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करत आहेत, ज्यांची मनापासून अशी इच्छा आहे की, ऑस्ट्रेलिया देश त्याच्या यातनांतून मुक्त व्हावा.

स्वामी अखंडानंद या धारणेच्या माध्यमातून सर्वांना ध्यानात घेऊन गेले की, ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर प्रचुरतेने पावसाचा वर्षाव होतो आहे. ही धारणा मेघ मल्हार रागाच्या स्वरांनी प्रेरित होती आणि या धारणेत त्या रागाच्या स्वरांचादेखील समावेश केला गेला होता.

त्यानंतर 'ॐ नमः शिवाय' ही मंत्रधून झाली; 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र सिद्धयोग परंपरेचा मंत्र आहे, संरक्षणाचा मंत्र आहे, हा तो मंत्र आहे ज्याचे गायन सिद्धयोगी प्रार्थना करण्यासाठी व आशीर्वाद

पाठवण्यासाठी करतात. राग तोच होता : मेघ मल्हार. मंत्राच्या प्रत्येक आवर्तनासह या रागाच्या रसांचा म्हणजेच शक्ती आणि गहन सुख या त्याच्या गुणांचा, पावसासाठी केलेल्या आवाहनाचा अनुभव अधिकाधिक होऊ लागला. संगीतातील चढउतार सर्वांच्या स्वरांमधून प्रवाहित होऊ लागले; सहभागी लोकांनी आपल्या बोधात ही प्रतिमा धारण केली की, दुष्काळग्रस्त स्थळी पावसाचा वर्षाव होतो आहे; नामसंकीर्तन आणि हा संपूर्ण सत्संग सामूहिक संकल्पशक्तीची अद्वितीय उदाहरणे बनली.

आणि या सत्संगातील काही अंश आता सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत, जेणेकरून सार्वभौमिक संघम्मधील सर्व लोकांनी ऑस्ट्रेलियाला आपल्या प्रार्थना व आशीर्वाद पाठवण्याकरता सहभागी होत राहावे.

स्मरणात असू द्या : आपण सारे एकच मानवजात आहोत. आपण परस्परांशी जोडलेले आहोत. सामंजस्यपूर्णतेच्या वेळी तसेच संकटसमयीदेखील, आपण एकजुटीने राहायला हवे. एकत्वाचा आपला बोध आपण नवीन उर्जेने भरून टाकला पाहिजे.

स्मरणात असू द्या : आपण सर्वजण एकाच धरणीचे आहोत. या धरणीचा एक भाग जर यातनाग्रस्त असेल, तर त्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. आपण त्या संवेदनांना जाणून घेतले पाहिजे. आपण सर्वांनी असा मार्ग शोधला पाहिजे, ज्यायोगे आपण आपल्या हृदयाचा भलेपणा सर्वत्र पोहोचवू शकू.

© २०२० एस. वाय.डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.